# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

## नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

(पोलीस वार्तापत्र)

सकाळ

**दिनांक 12.06.2019 बुधवार**

**(गुन्हे)**

**1) दारुबंदी, जुगार व ड्रंकन ड्राईव्ह कायदा अंतर्गत करण्यात आलेली कारवाई :**

मुदाका अन्वये 15 केसस 15 आरोपींना अटक करून, 31,596 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला. जुगार कायदा अन्वये 19 केसस 21 आरोपींना अटक करून 33,295 रू चा मुद्येमाल जप्त करण्यात आला.

मद्य प्राशन करुन वाहन चालविणा—या 57 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली आहे. वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण 702 वाहन चालकांवर कारवाई करण्यात आली असून एकूण तडजोड शुल्क 2,09,900 वसुल करण्यात आले आहेत.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून या पुढेही कारवाई प्रभावीपणे करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**2) पो.स्टे. जरीपटका — घरफोडी :**

दिनांक 05.06.2019 चे 1400 वा ते 11.06.2019 चे 1100 वा दरम्यान पो.स्टे. जरीपटका हद्यीत प्लॉट नं. 62/ए, जागृत नगर, सागर रेस्टॉरेंट समोर, नागपूर येथे राहणारे फिर्यादी कर्नलसिंग जिगरसिंग बमराह, वय 42 वर्ष, यांनी आपल्या घराला कुलूप लावून परिवारासह धार्मीक कामाने गाझीयाबाद येथे गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने घराचे दाराचा कुलूप कोडा तोडून आत प्रवेश करून बेडरूममधील कपाटातील सोन्याचांदीचे दागीने, असा एकुण 1,07,800 रू चा मुद्येमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. जरीपटका येथे पोहवा अब्दुल कयुम, 9372415171 यांनी आरोपीविरूध्द कलम 454,457,380 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

**3) पो.स्टे. गिट्टीखदान, बेलतरोडी — फसवणुक :**

**1) गिट्टीखदान** — दिनांक 04.07.2013 ते 31.03.2016 दरम्यान आरोपी क्र. 1) संजय मोटुमल कुकरेजा, वय 44 वर्ष, रा. फ्लॅट नं. 302, देव एन्क्लेव्ह अपार्टमेंट, कुशी नगर, नागपूर याने लोन मिळनेकामी पो.स्टे. गिट्टीखदान हद्यीत बॅंक ऑफ बडोदा, अनंत नगर, शाखा, नागपूर येथे सादर केलेल्या मॉगेज प्रॉपर्टचे कागदपत्राची बॅंकेतील संबंधीत आरोपी क्र. 2) महेश उदरनमल भटेजा, वय 41 वर्ष, रा. लक्ष्मी पॅलेस, कुशी नगर, नागपूर 3) अजय गंगाधर सुटे, वय 41 वर्ष, रा. प्लॉट नं. 165, धडीवाल ले आऊट, नागपूर, 4) वामन हेडाऊ, वय 61 वर्ष, रा. प्लॉट नं. 3, इंद्रप्रस्थ ले आऊट, वाडी, नागपूर, 5) ध्रितेश सुनील मन्ना, वय 32 वर्ष, रा. फ्लॅट नं. 22, दिशा नवागंज सिडको नं. 2, औरंगाबाद, 6) रमेश चंद्रभान लांबाहाते, वय 53 वर्ष, रा. प्लॉट नं. 20, अयोध्या नगर, नागपूर, 7) राजेश महावीर प्रसाद खरे, वय 63 वर्ष, रा. अभ्यंकर नगर, नुतन भारत शाळेजवळ, नागपूर, 8) विजय रामचंद्र पेटकर, वय 54 वर्ष, रा. दयालू सोसायटी, सी.एम.पी.टी.आय मेन रोड, जुना जरीपटका, नागपूर यांनी पडताळनी न करता आरोपी क्र. 1 यास लोन मंजुर करून बॅंकेतील मुद्दल 3 कोटी रूपयाची फसवणुक केली. याप्रकरणी फिर्यादी राजु पुरूषोत्तम अमरू, वय 50 वर्ष, (शाखा प्रबंधक) रा. फ्लॅट नं. 504, पाचवा माळा, फॅरेस्ट कॉलनी, सेमीनरी हिल्स, नागपूर यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो. स्टे. गिट्टीखदान येथे मपोउपनि यावले, 9011655284 यांनी आरोपीविरूध्द कलम 406,420,468,34 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

2) बेलतरोडी – दिनांक 27.05.2019 ते आजपावेतो इंडीया कॅश ए.टी.एम कोलकाता या कंपनीचे अधिकारी आरोपी क्र. 1) आकाश अग्रवाल, 2) श्वेता तिवारी, 3) स्नेहा शर्मा उर्फ घोष यांनी संगणमत करून ग्लोबर सोलुशन व इंडीया कॅश ए.टी.एम कोलकाता या कंपनीचे अधिकारी असल्याचे खोटे सांगून एका वर्तमान पत्रात दिनांक 27.05.2019 रोजी बॅकेचे ए.टी.एम मशीन लावण्याचे जागा भाडयाने घेण्यासाठी जाहीरात दिली. त्यानुसार पो.स्टे. बेलतरोडी हद्यीत प्लॉट नं. 173,174, जया दुर्गा सोसायटी, नं. 3, महाजन हार्डवेअर मागे, मनीष नगर, नागपूर येथे राहणारे फिर्यादी दत्तात्रय मुरलीधर येलुकर, वय 66 वर्ष, यांनी जाहीरात मधील मोबाईल नंबरवर संपर्क साधून ए.टी.एम मशीन करीता जागा भाडयाने घेण्यासाठी 10 लाख डिपॉझीट, दरमहा 20,000 रू भाडे, नोकरी, व मोटारसायकल चे आमीश देवून जागा भाडयाने देण्याचे ॲग्रीमेट ई मेल वर करून वारंवार फोन करून संपर्क साधून फिर्यादीला यांचा विश्वास संपादन करून ए.टी.एम मशीन लावण्याकरीता ॲग्रीमेंट फी व इंशुरन्स पॉलनीशी फी करीता 58,600 रू आरोपींच्या बॅक खात्यात एन.एफ.ई.टी व्दारे वर्ग करून घेवून फिर्यादीची फसवणुक केली. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. बेलतरोडी येथे पोहवा सुरेश शेजव, 7620934688 यांनी आरोपीविरूध्द कलम 419,420,34 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

4) पो.स्टे. जरीपटका – विनयभंग :

दिनांक 08.06.2019 चे 1000 वा ते 1100 वा दरम्यान पो.स्टे. जरीपटका हद्यीत राहणा–या फिर्यादी यांची 8 वर्षीय अल्पवयीन मुलगी हीला अनोळखी आरोपीने पिडीत मुलीच्या मनास लज्जा उत्पन्न होईल असे अश्लील वर्तन करून विनयभंग केला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. जरीपटका येथे पोउपनि खांडेकर, 8329388005 यांनी आरोपीविरूध्द कलम 354 भादंवि सहकलम 8 पोक्सो ॲक्ट अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

5) पो.स्टे. प्रतापनगर – चोरी :

फिर्यादी सत्यप्रकाश सुरेश कंटकवार, वय 38 वर्ष, रा. प्लॅाट नं. 411, गल्ली नं. 10, मिनी माता नगर, भंडारा रोड, नागपूर हे प्रकाश प्लायऊड टिंबर भवन, लकडगंज, नागपूर येथे मार्केटींग व वसुलीचे काम करतात. ते मालकाचे गाडी क्र. एमएच/31/ई.यु/7773 ने सोबत ड्रायव्हर अतुल सह कारंजा, वाशीम, पुसद, दिग्रस, दारव्हा, यवतमाळ या ठिकाणी प्लायऊंड विक्रीचे वसुलीची रक्कम 1,35,300 रू व 3 चेक वसुल करून गाडीमध्ये ड्रयव्हर सिटचे मागे खाली ठेवून दिनांक 11.06.2019 चे 2130 वा ते 2200 वा दरम्यान पो.स्टे. प्रतापनगर हद्यीत वर्धा रोड, रेडीसन ब्लु हॉटेल समोर, मराठा सावजी भोजनालय, येथे गाडी उभी करून जेवन करण्यासाठी गेले असता कोणीतरी अज्ञात चोराने बॅगमध्ये ठेवलेले वरील मुद्येमाल चोरून नेला. याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पो.स्टे. प्रतापनगर येथे पोउपनि ठाकुर, 8888807510 यांनी आरोपीविरूध्द कलम 379 भादंवि अन्वये गुन्हा नोंदविला आहे.

(अकस्मात मृत्यु)

पो.स्टे. वाडी, सक्करदरा, हुडकेश्वर, गणेशपेठ, अंबाझरी, लकडगंज, कळमना :

1) वाडी – दिनांक 07.06.2019 चे 0200 वा चे सुमारास पो.स्टे. वाडी हद्यीत चंद्रमनी चौक, मेश्राम यांचे घरी किरायाने, नागपूर येथे राहणारे मिलींद सुखदेव बंसोड, वय 40 वर्ष, मुळ पत्ता आजनगांव चौरस, तह पवनी, जि. भंडारा यांनी कोणतेतरी विषारी औषध प्राशन केल्याने त्यांची प्रकृती खराब झाली. त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 11.06.2019 चे 1200 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. वाडी येथे पोहवा राजेंद्र, 8888820644 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

2) सक्करदरा – दिनांक 11.06.2019 चे 1545 वा चे सुमारास पो.स्टे. सक्करदरा हद्यीत सोमवारी क्वॉर्टर नं. 190/2, जुनी पाणी टाकीजवळ, नागपूर येथे राहणारे हरिहर शिवराम सुरजुसे, वय 65 वर्ष, यांची प्रकृती खराब झाल्याने त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. सक्करदरा येथे सपोउपनि सानप, 9823480077 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

3) हुडकेश्वर – दिनांक 10.06.2019 चे 2130 वा चे सुमारास पो.स्टे. हुडकेश्वर हद्यीत प्लॉट नं. 50, संभाजी नगर, न्यु नरसाळा रोड, नागपूर येथे राहणा–या कु. रेखा ज्ञानेश्वर वांढरे, वय 36 वर्ष, या घराचे गल्लीत खाली पडल्याने त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल येथे नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. हुडकेश्वर येथे पोउपनि कावरे, 9404073619 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

4) गणेशपेठ – दिनांक 11.06.2019 चे 1150 वा चे सुमारास अंदाजे 55 वर्ष वयोगटातील एक अनोळखी इसम याची पो.स्टे. गणेशपेठ हद्यीत महात्मा फुले मार्केट, नागपूर येथे प्रकृती खराब झाल्याने त्याला उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 11.06.2019 चे 1846 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. गणेशपेठ येथे पोउपनि इंगळे, 7588523831 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

5) अंबाझरी – दिनांक 10.06.2019 चे 1430 वा चे सुमारास अनील रामलाल गजभीये, वय 46 वर्ष, रा. पांढराबोडी, रवि नगर झोपडपट्टी, नागपूर हे पो.स्टे. अंबाझरी हद्यीत गोकुळपेठ पोलीस चौकी जवळ, सुलभ शौचालय मागे, नागपूर येथे बेशुध्द अवस्थेत मिळून आले. त्यांना उपचाराकरीता मेयो हॉस्पीटल येथे भरती केले असता उपचारादरम्यान दिनांक 11.06.2019 चे 0730 वा चे सुमारास डॉक्टरांनी तपासून मृत घोषीत केले. याप्रकरणी मिळालेल्या सुचनेवरून पो.स्टे. अंबाझरी येथे पोउपनि ठाकरे, 9096604476 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

6) लकडगंज – दिनांक 11.06.2019 चे 2230 वा चे सुमारास अंदाजे 25 ते 30 वर्ष वयोगटातील एक अनोळखी इसम त्याचे हातावर रंजीत व प्रशांत असे गोदलेले आहे. हा पो.स्टे. लकडगंज हद्यीत लकडगंज गृह बांधनी प्रकल्पची मेन गेट जवळ, जुना भंडारा रोड, नागपूर येथे मृत अवस्थेत मिळून आला. याप्रकरणी फिर्यादी जावेद अली अफसर अली, वय 49 वर्ष, रा. वर्फ फॅक्ट्रीरी मागे, ताजबाग, सक्करदरा, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. लकडगंज येथे पोउपनि राऊत, 9881907464 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

7) कळमना – दिनांक 12.06.2019 चे 0030 वा चे सुमारास अंदाजे 50 वर्ष वयोगटातील एक अनोळखी इसम हा पो.स्टे. कळमना हद्यीत कळमना सब्जी मार्केट, खल्ला नं. 3 चे बाजुला रोडवर मृत अवस्थेत मिळून आला. याप्रकरणी फिर्यादी लोकेश जैनदास मारकंडे, वय 20 वर्ष, रा. विजय नगर, दुर्गा चौक, नागपूर यांनी दिलेल्या सुचनेवरून पो.स्टे. कळमना येथे पोउपनि इंगोले, 9021172041 यांनी अकस्मात मृत्युची नोंद केली आहे.

पोलीस जनसंपर्क अधिकारी
नागपूर शहर